# भाषाविषयक क्षमता : प्रथम भाषा मराठी

**इयत्ता अकरावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | • श्राव्य माध्यमांतील चर्चा, परिसंवाद, निवेदन, जाहिरात, बातम्या, सूत्रसंचालन, रेडिओजॉकीचे कार्यक्रम इत्यादींमधील भाषिक वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्यांतील विचार समजून घेणे.<br>• सार्वजनिक ठिकाणी दिल्या जाणाऱ्या सूचनांमधील शब्दयोजना समजून त्याला योग्य प्रतिसाद देणे.<br>• औपचारिक व अनौपचारिक ठिकाणी होणारी व्याख्याने, संवाद-संभाषणे यांतील संदर्भांचा चिकित्सकपणे अर्थ लावता येणे.<br>• भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी विविध श्राव्य माध्यमांचा उदा., आकाशवाणी व ध्वनिफिती यांचा माहितीचे स्रोत म्हणून उपयोग करणे.<br>• आंतरजालावरून लिंक्स, क्यू. आर. कोड, व्हिडिओज, यू ट्यूब व प्रसारमाध्यमे, इत्यादी दृकश्राव्य माध्यमांतून अपेक्षित व अध्ययनपूरक संदर्भ विकसित करता येणे. |
| भाषण–संभाषण | • विविध साहित्यकृतींवर आधारित चर्चेत सहभागी होताना साधक-बाधक विचारांच्या मांडणीसाठी विषयानुरूप भाषा वापरता येणे.<br>• साहित्यप्रकारांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये सांगता येणे.<br>• सूत्रसंचालन, रेडिओजॉकी या घटकांचे सादरीकरण करता येणे.<br>• विषयाला अनुसरून स्वत:चे स्वतंत्र विचार संदर्भासहित मांडता येणे.<br>• भाषण-संभाषण कौशल्यांची वैशिष्ट्ये आत्मसात करून त्याचा व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने आत्मविश्वासपूर्वक वापर करता येणे. |
| वाचन | • नाटक, कथा, काव्य व अन्य साहित्यकृतींचे अभिवाचन करता येणे.<br>• संकेतस्थळावरील ई-बुक्स, ई-न्यूज आणि ई-साहित्य शोधून वाचन करता येणे.<br>• स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने मराठी भाषाविषयाशी संबंधित उपयुक्त घटकांचे अभ्यासपूर्ण वाचन करणे.<br>• पाठ व पाठाशी संबंधित मूळ साहित्यकृतीचे व संदर्भ साहित्याचे वाचन करणे.<br>• साहित्याच्या आस्वादासाठी वाचन करणे. |

| | |
|---|---|
| लेखन | • पाठाचा आशय व त्या पाठातील विचार यांबाबत स्वत:चे मत, स्वत:च्या भाषेत समर्पक शब्दांत लिहिणे.<br>• जे अनुभव घेतले, जे निरीक्षण केले त्यांवर केलेला विचार यांबाबत लिखित स्वरूपात अभिव्यक्त होणे.<br>• स्वत:चा ब्लॉग लिहिता येणे.<br>• अनुवाद करण्याचे तंत्र प्राप्त करणे. |
| अध्ययन कौशल्य | • संदर्भासाठी कोशवाङ्‌मय अभ्यासता येणे.<br>• अनुभवलेल्या विविध घटनांसंदर्भात व्यापक अर्थाने अभिव्यक्त होता येणे.<br>• आंतरजालाचा वापर करून व्यवहार करता येणे.<br>• संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा उत्तमरीत्या कृतियुक्त वापर करता येणे.<br>• प्रसारमाध्यमांतून समोर येणाऱ्या घटकांचे सांगोपांग आकलन करून त्याविषयी चिकित्सक मांडणी करता येणे.<br>• विविध सामाजिक अडसरांचे आकलन करून घेऊन, त्यांच्या निर्मूलनासाठी स्पष्टपणे विचारांची मांडणी करता येणे.<br>• बहुभाषा परिचय करून घेण्याची जिज्ञासा निर्माण होणे.<br>• वाङ्‌मयीन उपक्रमांद्‌वारे अभिरुची घडवणे व सहभागातून ती वृद्‌धिंगत करणे.<br>• तंत्रज्ञान आणि आंतरजाल यांचा योग्य वापर करून ‘स्व’ला अभिव्यक्त करून विकसित करता येणे.<br>• लेखननियमांनुसार मुद्रितशोधनाचे कौशल्य प्राप्त करता येणे. |
| भाषाभ्यास | • भाषाभ्यास–वाक्यसंश्लेषण, काळाचे उपप्रकार, शब्दभेद, वाक्प्रचार व म्हणी, गटात न बसणारा शब्द, पारिभाषिक शब्द, इंग्रजी आणि मराठी म्हणी, काही साहित्यिकांची टोपण नावे व पूर्ण नावे, काही साहित्यिक व त्यांच्या प्रसिद्‌ध रचना, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त मराठी साहित्यिक.<br>• भाषासौंदर्य– शब्दशक्ती, काव्यगुण, अर्थच्छटा<br>या सर्व संकल्पनांचे आकलन करून घेऊन स्वत:च्या भाषेत त्याचे उपयोजन कौशल्यपूर्ण रीतीने करता येणे. |